अनधिकृत अकृषिक वापर/वापरातबदल
केल्याबाबत आकारण्यात आलेल्या दंडाच्या
रकमेत सवलत देण्याबाबतची योजना.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र.एनएए १०/२००१/प्र.क्र.४६१/ल-५,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- १४ /३/२००२.

शासन निर्णय :-

सध्या संपूर्ण राज्यात महसूली उत्पन्न वाढविण्यासाठी अनधिकृत अकृषिक वापराबाबतची प्रकरणे शोधन मोहीम राबविणेत येत असून अशा अनधिकृत अकृषिक वापराच्या प्रकरणांमध्ये दंडात्मक कार्यवाही करणेत येत आहे. राज्यातील बहुतांश ठिकाणी अनधिकृत अकृषिक वापराचे प्रत्येक प्रकरण गुणवत्तेवर न तपासता अशा प्रकरणात सरसकट ४० पट दंड भरण्याबाबत संबंधितांना नोटीसा देणेत येत असून दंडाची व अकृषिक आकारणीची रक्कम भरण्याबाबत सक्ती करणेत येत आहे. अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याबाबत काही लोकप्रतिनिधींकडून सन २००१ च्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्नही विचारणेत आले होते. अनधिकृत अकृषिक वापराबाबतच्या आकाराची थकबाकी अनेक वर्षाची असलेने संबंधित खातेदार ती ४० पट दंडासह भरत नाहीत. त्यामुळे शासनास अपेक्षित असलेला महसूल मिळत नाही. मात्र, वसूल करावयाची रक्कम कागदावर मोठी दिसते. शासनाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता, मोठया प्रमाणावर थकबाकी असलेल्या अनधिकृत अकृषिक वापराच्या आकारणीची व त्यावरील दंडाची रक्कम वसूल करून शासनाच्या साधन संपत्तीमध्ये भर घालणे अत्यंत आवश्यक झालेले आहे.

अकृषिक आकारणीच्या ४० पट दंड अनधिकृत अकृषिक वापराकरिता लावण्यात आल्यामुळे व ही रक्कम गेल्या अनेक वर्षांची थकबाकी असल्यामुळे कोणत्याही व्यक्तीस तिचा एकरकमी भरणा करणे अत्यंत अडचणीचे व त्रासदायक आहे. त्यादृष्टीने सर्व विचार केल्यावर असे निश्चित केले आहे की, अनधिकृत अकृषिक वापराबाबत आकारण्यात आलेल्या दंडाच्या रकमेत सवलत देण्याची योजना जाहिर केल्यास, जेणे करुन दंडाची रक्कम भरणाऱ्या संबंधित खातेदारांवर जास्त आर्थिक बोजा पडणार नाही व शासनास देखील महसूल प्राप्त होईल. या दंड सवलतीच्या योजनेमुळे जास्तीत जास्त लोक ही आकारणी व दंड शासनाकडे भरणा करतील अशी अपेक्षा आहे. या योजनेमुळे वर्षानुवर्षे अकृषिक आकारणीपोटी थकित राहिलेला महसूल गोळा होण्यास मदत होईल व खातेदारासही सवलत दिल्याने जनतेतील असंतोष दूर होण्यास मदत होईल. तसेच दरवर्षी अकृषिक आकार भरणाऱ्यांची संख्याही वाढेल व त्यामुळे दरवर्षीच्या अकृषिक आकारणीपोटी शासनास मिळणाऱ्या महसूलात वाढ देखील होईल. त्याअनुषंगाने अनधिकृत अकृषिक वापर केल्याबाबतच्या प्रकरणात जास्तीत जास्त नागरिकांना आकारणीचा व दंडाचा भरणा करण्याची सवलत देण्यासाठी, दंडाच्या रकमेमध्ये

योजना विचारात देणे कालानुरुप आवश्यक झाले आहे. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

(१) अनधिकृत अकृषिक वापर व जमिनीच्या वापरातील बदल यासाठी आकारावयाचा दंड खालीलप्रमाणे आकारण्यात यावा:-

(अ) अनधिकृत अकृषिक वापर - रहिवास - वार्षिक अकृषिक आकारणीच्या एक पट

(ब) अनधिकृत अकृषिक वापर - औदयोगिक - वार्षिक अकृषिक आकारणीच्या दीड पट

(क) अनधिकृत अकृषिक वापर - वाणिज्य - वार्षिक अकृषिक आकारणीच्या दोन पट

(ड) जमिनीच्या अनधिकृत वापरातील बदल असल्यास जो बदललेला वापर असेल त्यास वरील (अ), (ब) व (क) यापैकी जो लागू होईल तो दंड.

(२) दंड सवलतीच्या योजनेचा कालावधी या आदेशाच्या तारखेपासून ३१ मे, २००२ पर्यंत लागू राहील.

(३) दंड सवलतीची योजना लागू केल्यानंतरही, "महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६" चे कलम ४५ अन्वये अनधिकृत अकृषिक वापर नियमित करण्याबाबतच्या कायद्यातील प्रचलित तरतुदी संबंधितांवर बंधनकारक राहतील. ही दंड सवलतीची योजना, दंडाच्या रकमेच्या सवलती पुरतीच मर्यादित राहील. दंडाच्या सवलतीची रक्कम भरली म्हणजे अनधिकृत अकृषिक वापर नियमित झाला असे ग्राहय मानता येणार नाही. त्यासाठी बांधकाम नियमावली व कायद्यातील इतर तरतुदींचे पालन अनधिकृत अकृषिक वापर करतांना केले आहे की नाही याची शहानिशा नेहमीप्रमाणे केल्यानंतरच अनधिकृत अकृषिक वापर नियमानुकूल केल्याचे अंतीम आदेश संबंधित महसूल अधिकाऱ्यांकडून पारित करण्यात यावे.



(४) या प्रकरणी शासन पत्र समक्रमांक दिनांक ३/१/२००२ अन्वये दिलेली स्थगिती उठविण्यात येत आहे.

(५) हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र:- प्रकरण क्र.११२/२००२ / व्यय-९, दिनांक २३/१/२००२ ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(विकास देशमुख)

सचिव